| 3. | Cleaning Swapping and washing floor | १.Vegetable cutting area<br>२. Main Kitchen total floor<br>३. Grocery Stores<br>४. Wet Stores<br>५. Crockery washing & wiping area<br>६. All passages . | Four times Daily |
| 4. | Removal of cobwebs & cleaning of fans etc. clearing of window fans | All Kitchen & Mess Hall | Forth nightly<br>also as per requirement |
| 5. | Exhaust Cleaning | Kitchen | Every week |
| 6. | Window, Exhaust Fan, Ceiling Fan, Doors Dusting & Cleaning | Kitchen Window glass,<br>Window Exhaust Fan<br>Veg. cutting area ceiling fan.<br>All doors in Kitchen area | Every week |
| 7. | Cooking Equipment Cleaning | All Cooking Range<br>Dosa Bhutti<br>Chappati Rangeus<br>IDLI Steamer | Daily Every Use |

Sd HM     Sd/- Head Proc     Sd/- Registrar     Sd/- F A

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

| Sr.No | Description | Area | Periodicity |
|---|---|---|---|
| 8. | Deep Freezers | Four Door Chiller<br>Flat Deep Freezer | Daily Once |
| 9. | Dish washing & Utensil washing | Service Dish Washing area<br>Utensil washing area & wash basin | Daily Every Use |
| 10. | Sanitization | Knife , Cutting area platform , Cooking Food assemble Table, Side Table , Mess Hall Table ,Table mate, Serving spoon, Bain Marie , All Trolley, Tea Utensils etc. | Daily Every Use |
| 11. | Steel Polishing | All steel cooking ranges, Bain Marie , All Steel Tables, Steel Wash Basin & Tabs, | Twice in a week |

---

## <u>परिशिष्ट 'ए'</u>

**वैदयकीय तपासणी**

१ हिमोग्राम
२ विडाल टेस्ट
३ इ एस आर
४ एच बी एस ए बी सी (हिपाटायटिस्ट बी टेस्ट)
५ युरीन रुटीन
६ **Stool Routine**
७ चेस्ट एक्सरे
८ General Hygiene- Nails, Cleanness etc.

| | | | |
|---|---|---|---|
| Sd | Sd/- | Sd/- | Sd/- |
| HM | Head Proc | Registrar | F A |

---

***यशदातील भोजन व्यवस्थेसाठी* अटी आणि शर्ती :-**

०१. भोजनाची निविदा अंतिम करताना पुढील कार्यवाहीचा अवलंब करण्यात येईल.

अ. यशदातील भोजनाची निविदा न्युनतम आहे की नाही हे तपासताना लिफाफा क्र. २ मधील अनु. क्रमांक ३ दरपत्रक **'अ १'** मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे एका व्यक्तीसाठी एक दिवसाचा एकूण दर ज्याचा न्युनतम असेल त्यानुसार तुलना करून भोजन कंत्राटदाराची निविदा निश्चिती करण्यात येईल. ज्या निविदाधारकाचे दर दरपत्रक **'अ १'** मध्ये न्युनतम असेल त्यांना इतर निविदाधारकाचे दरपत्रक ब मध्ये न्युनतम असेलेल्या इतर (१ ते ५) दरांसोबत Match करणे बंधनकारक राहील.

ब. यशदातील डीएसी मेससाठी **वस्तु व सेवाकर (GST) वगळुन इतर सर्व करासह** दर मागविण्यात येत आहेत. निविदादारांनी त्याचा विचार करुन लिफाफा ०२, दराबाबतच्या लिफाफयामध्ये दर नमूद करावेत. शासनाच्या मान्य दरानुसार यशदाकडुन वस्तु व सेवाकराची (GST) रक्कम ठेकेदारास वेगळयाने अदा करण्यात येईल.

०२. भोजनाची निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून पंधरा दिवसांच्या आत भोजन कंत्राटदाराने संस्थेबरोबर मान्य निविदा रक्कमे नुसार विहित रकमेच्या स्टँपपेपरवर करारनामा करावा लागेल. स्टँप व इतर नोंदणी खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे. कराराची मुळ प्रत यशदाकडे राखुन ठेवण्यात येईल.

०३. निविदा मंजूर झाल्यानंतर भोजन कंत्राटदाराने संस्थेकडे दोन वर्षासाठीच्या अदांजित एकुण उलाढालीच्या रकमेवर 3% रक्कम एवढी बिनव्याजी सुरक्षा ठेव म्हणून ठेवणे बंधनकारक राहील. कराराची मुळ मुदत संपल्यानंतर ही रक्कम भोजन कंत्राटदाराला त्यांच्याकडून झालेले संस्थेचे नुकसान वजा करून परत करण्यात येईल. त्याचप्रमाणे भोजन व्यवस्थेचा करार कोणत्याही कारणास्तव संपुष्टात आल्यास त्याच्या कामगारांचे वेतन आणि इतर अनुशंगीक देणी याबाबत कामगारांकडून कार्यरत असताना लेखी तक्रार आल्यास त्याची शहानिशा करुन योग्य ती पूढील कार्यवाही करण्यात येईल.

०४. यशदामार्फत भोजनालयाची इमारत आणि भोजन तयार करण्यासाठी लागणाऱ्या वस्तू संस्थेमार्फत पुरवठा करण्यात येईल. त्या सर्व बाबी कंत्राटदाराला वापरासाठी विनामोबदला देण्यात येतील. या व्यतिरिक्त लागणाऱ्या वस्तू कंत्राटदाराने स्वखर्चाने विकत आणाव्या लागतील. भोजन गृहाचा ताबा घेतेवेळी कंत्राटदाराने वरील सर्व वस्तू सुस्थितीत वापरण्यास योग्य आहेत अथवा कसे हे तपासून ताब्यात घ्याव्यात. नंतर काही तक्रार चालणार नाही. या वस्तूंचा वापर कंत्राटदाराने काळजीपूर्वक केला पाहिजे. निष्काळजीपणामुळे किंवा चुकीच्या वापरामुळे नुकसान होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. नेहमीच्या सतत वापरामुळे काही वस्तूची दुरूस्ती आवश्यक वाटल्यास किंवा निदर्शनास आल्यास कंत्राटदाराने स्वत:च्या खर्चाने तातडीने (२४तासाच्या आत) दुरुस्ती करून घेणे बंधनकारक राहील. पुरवठा केलेल्या सर्व वस्तूंवर संस्थेचा मालकी हक्क राहील. संस्थेच्या परवानगी शिवाय पुरवठा केलेल्या वस्तू संस्थेच्या बाहेर घेऊन जाता येणार नाहीत. पुरवठा केलेल्या वस्तु वापरणे बंधनकारक राहीलच परंतु संस्थेने एखादी नवीन वस्तु खरेदी केल्यास ती वापरणेसुध्दा बंधनकारक राहिल व त्याची देखभालीची पुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

०५. कंत्राटदाराला त्याच्या बाजूने काही अत्याधुनीक यंत्रसामुग्री भोजनगृहात वापरण्यासाठी बसवावयाची असल्यास (भिंत किंवा जमिनीत फिक्स करून) संस्थेची लेखी परवानगी घेणे बंधनकारक राहील. त्याशिवाय असे वस्तु संस्थेचे आत आणू नये तसेच सोडुन जाताना स्वत:ची सामुग्री यशदाच्या मालमत्तेची नुकसान न करता घेवुन जावी लागेल याची जबाबदारी भोजन कंत्राटदारावर राहील. हे करीत असताना संस्थेच्या इमारतीला वा अन्य कोणत्याही साधनसामुग्रीचे नुकसान होणार नाही याची दक्षता भोजन कंत्राटदाराने घ्यावी. संस्थेच्या मालमत्तेचे नुकसान होत आहे अशी चूक आढळून आल्यास दुरुस्तीपोटी आलेला पुर्ण खर्च कंत्राटदाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

०६.	पुरवठा करण्यात आलेल्या वस्तु, उपकरणे, क्रॉकरी इ. साहित्य नियमितपणे स्वच्छ करुन ठेवणे आवश्यक आहे. जर वस्तू अस्वच्छ व घाण आढळल्यास त्यासाठी प्रत्येक प्रकरणी रु.१०००/- इतका दंड आकारण्यात येईल.

०७.	कंत्राटदाराच्या प्रत्यक्ष वापराच्या वेळी गॅस बर्नरची तुट-फूट होवून नादुरूस्त झाल्यास नवीन स्पेअरपार्टसची किंमत व येणाऱ्या खर्चाची रक्कम कंत्राटदाराने संबंधित एजन्सीला अदा करावी. असे न केल्यास कंत्राटदाराचे देयकातुन वसुल करुन देखभाल करणारी एजन्सी ला अदा करण्यात येईल. गॅस सिलेंडरची आणि त्यापासून उद्भवू शकणाऱ्या सर्व धोक्यांची जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्याच्या देखभालीची तसेच सुरक्षित कामकाजाचीही पूर्ण जबाबदारी सदर कंत्राटदारावर राहील.

०८.	भोजन गृहातील कामकाज सुरळीत चालण्याच्या दुष्टीने कर्मचारी संख्या पूरविणे आवश्यक आहे. त्या व्यतीरिक्त जास्तीचे कर्मचारी कंत्राटदार त्याच्या आवश्यकतेनुसार घेऊ शकतील व त्यासाठी संस्थेकडून दरामध्ये वेगळी वाढ दिली जाणार नाही.कंत्राटदारांच्या कर्मचाऱ्यांना F & B चा अनुभव असावा.

अ) **बेड टी (Bed Tea), न्याहारी, सकाळचा प्रशिक्षण वर्ग येथील चहा, दुपारचे भोजन, दुपारचा प्रशिक्षण वर्ग येथील चहा, रात्रीचे भोजन व कार्यालयीन कर्मचारी यांचा सकाळचा व दुपारचा चहा जागेवर देणे यासाठी आवश्यक कर्मचारी राहतील याची काळजी घेणे बंधनकारक आहे**

१. पर्यवेक्षक - १
२. हेडकूक - १
३. सहायक कुक - ३
४. पॅन्ट्रीमॅन - १
५. हेल्पर - २
६. मोरी कामगार- ३
७. सर्विस बॉईज - १२

याउपर प्रशिक्षणसत्रांची संख्या लक्षात घेवून कर्मचा-यांची संख्या कमी जास्त करण्यासाठी वसतिगृह व्यवस्थापक/ निबंधक किंवा मा. महासंचालक यांनी प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तिकडे ठेकेदारास लेखी अर्ज किंवा तोंडी चर्चा करुन सदर प्राधिका-यांच्या मान्यतेने मनुष्यबळाबाबत गरजेनुसार कार्यवाही करता येईल.

०९.	कंत्राटदाराने कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यापूर्वी त्याच्या ओळख पडताळणीसाठी त्याचा अलिकडच्या काळातील फोटो, रेशन कार्डची झेरॉक्स प्रत, तसेच त्याचा शाळा सोडल्याचा दाखला/मतदान ओळखपत्र/वाहन परवाना इत्यादी माहिती देणे बंधनकारक आहे तसेच कर्मचाऱ्यांची पोलीस पडताळणी करुन तसा अहवाल वसतिगृह व्यवस्थापक यशदा यांना सादर करावा. सदरच्या माहिती मध्ये काही गैर आढळल्यास त्या कर्मचाऱ्याला भोजन गृहात काम करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

१०.	कंत्राटदारामार्फत भोजन गृहात काम करणा-या प्रत्येक कर्मचाऱ्याची वैद्यकीय तपासणी **परिशिष्ट 'ए'** मध्ये नमूद केल्यानुसार नेमणूक करण्यापूर्वी आणि त्यानंतर दरवर्षी तपासणी संस्थेतील वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत करुन घेऊन तसा अहवाल वसतीगृह व्यवस्थापक यांच्याकडे सादर करावा वैद्यकीय अधिकाऱ्याच्या तपासणीमध्ये शारिरिकदृष्टया अपात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तिस कंत्राटदार यशदाच्या आवारात कामासाठी ठेवणार नाही. कामावर असलेल्या कंत्राटदाराच्या कोणत्याही कामगारास शारिरिक, सांसर्गिक व्याधी असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची बाब तात्काळ कंत्राटदाराच्या निदर्शनास आणण्यात येईल. अशी बाब निदर्शनास आल्यानंतर कंत्राटदाराने सदर कामगारास तात्काळ यशदाच्या आवारातून दुर करावयाचे आहे.

११.	भोजन कंत्राटदाराने स्वत:च्या खर्चाने भोजनालयातील प्रत्येक (वेटर) कर्मचाऱ्यांना काळी पँट व पांढरा शर्ट या रंगाचे दोन जोड गणवेष, शूज आणि मोजे तसेच स्वयंपाकघरात काम करणा-या आचा-यांना (कुक) काळी पँट, कुककोट पांढऱ्या रंगाचा, पांढरे ॲपरन, टोपी, हेअर मास्क, माऊथ मास्क, इ. साहित्य पूरवावे लागेल.असे न केल्यास प्रत्येक प्रकरणी रु.१,०००/- इतका दंड आकारण्यात येईल.

१२.	दैनंदिन अंतर्गत वापरासाठी यशदा मार्फत भोजनगृहामध्ये एक विस्तारीत दुरध्वनीसंच पुरविण्यात येईल, त्यासाठी कोणत्याही प्रकारचे भाडे आकारले जाणार नाही. त्याच प्रमाणे भोजनालयासाठी पाणी आणि वीज हे युनिट प्रमाणे कत्रांटदाराला भरावे लागेल.त्यासाठी स्वतंत्र मीटर लावण्यात येईल.

१३.	भोजन कंत्राटदारने स्वत:च्या खर्चाने किचनचा पूर्ण भाग, किचन ओटा, भांडी धुण्याची जागा, धान्यांचे भांडारगृह, स्वत:चे कक्ष, पेंट्री रुम, गॅस स्टोरेज, किचनचे टाईल्स तसेच प्लॅटफॉर्म नियमितपणे स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहील. कोणत्याही प्रकारची दुर्गंधी व घाणेरडे डाग भिंतीवर अथवा फरशीवर ठेवु नयेत. स्वच्छतेसाठी Standard Cleaning Material वापरण्यात यावे. अस्वच्छता दिसून आल्यास प्रत्येक प्रकरणी रुपये १०००/- दंड आकारण्यात येईल.

१४.	उरलेले शिळे अन्न/खरखटे ब्लॅक प्लॅस्टिक डिसपोझेबल बॅग मध्ये बंद करुन त्याची विल्हेवाट यशदाच्या आवाराबाहेर करण्याची जबाबरी संपूर्णपणे कंत्राटदाराची राहिल. यशदाच्या आवाराबाहेर कचऱ्याची विल्हेवाट करताना महानगरपालिकेकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार उद्भवल्यास त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी सर्वस्वी कंत्राटदाराची असेल. कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट न केल्याचे आढळल्यास प्रत्येक प्रकरणी रुपये १,०००/- दंड आकारण्यात येईल.

१५.	भोजनगृहातील वॉश बेसीन, पंखे, खिडक्या, दिवे डायनिंग खुर्च्या व टेबल, फरश्या त्या सभोवतालचा परिसराची स्वच्छता संस्थेकडून ठेवण्यात येईल. त्यासाठी संस्थेने नेमलेल्या गृहपालन सफाई कंत्राटदाराकडील एक सफाई कामगारामार्फत वरील कामे करण्यात येतील. सफाई कामगाराच्या पगारापोटी **रू ३०००/-** एवढ्या रक्कमेची भोजन कंत्राटदाराच्या प्रत्येक महिन्याच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

१६.	भोजन कंत्राटदाराला या सर्व व्यवस्थेसाठी लागणारा कर्मचारी वर्ग अट क्र. ८ मध्ये नमूद केल्यानुसार स्वखर्चाने नेमला पाहिजे. तसेच कामगार २० पेक्षा जास्त असल्याने कामगार परवान्याची (Labour Licence) प्रत एक महिन्याच्या आत जमा करावी लागेल. सदर कर्मचाऱ्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या कामगार किमान वेतन कायदा, राज्य कामगार विमा योजना, भविष्यनिर्वाह निधी, बोनस ॲक्ट, घरभाडे भत्ता ॲक्ट व वेळोवेळी लागू होणाऱ्या बदलानुसार नियम / तरतूदी नुसार आणि इतर कायदेशीर नियमांचे पालन करुन त्यांनी नेमलेल्या कर्मचाऱ्यांना वेतन / मानधन देणे आवश्यक राहील तसेच सदर नियमानुसार वेळोवेळी शासनाकडे करावा लागणारा भरणा हा भोजन कंत्राटदार यांनी स्वत: करावयाचा आहे तसेच भोजन व्यवस्थेबाबत आकारण्यात येणारे केंद्र, राज्य स्थानिक संस्थांचे कर, परवाने फी, इत्यादी भोजन कंत्राटदारास भरावी लागेल. कामगार कायद्याच्या तरतुदींचे पालन कंत्राटदार करेल अशी लेखी हमी कंत्राटदाराने देणे बंधनकारक राहील. या बाबत कर्मचाऱ्यांकडून कार्यरत असताना लेखी तक्रार आल्यास तक्रारीचे शहानीशा करुन संबंधित शासकीय कार्यालयास त्याबाबत कळविण्यात येईल. याबाबत यशदा संस्था जबाबदार राहणार नाही.

१७.	भोजन कंत्राटदाराने भोजनगृह चालविण्यासाठी **अन्न व औषध सुरक्षा प्रशासन, महाराष्ट्र शासन** (**Food and Drug Safety**) यांचा परवाना तसेच नियमाप्रमाणे आवश्यक असलेले महानगरपालिकेचे सर्व परवाने स्वखर्चाने काढले पाहिजेत व त्याची मुळ प्रत यशदाला ठेका मिळाल्यापासुन ३० दिवसांच्या आत जमा करणे आणि त्याचे नुतनीकरण वेळोवेळी करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास भोजन व्यवस्थेची देयके अदा केली जाणार नाहीत.

१८.	यशदाच्या आवारातील प्रशिक्षणार्थीसाठी असलेल्या कोणत्याही सुविधांचा वापर करण्याची आपल्या मार्फत नियूक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना परवानगी राहणार नाही. उदा. बॅडमिंटन, व्यायामशाळा, व्हीजीटर्स लाँजमध्ये टि. व्ही. पहाणे, वर्तमानपत्रे वाचणे, टेबलटेनिस, पोहण्याचा (स्वीमिंग पूलचा) वापर इत्यादी.

१९.	भोजनगृहाचा उपयोग फक्त संस्थेचे प्रशिक्षणार्थी, अधिकारी, कर्मचारी किंवा मा. महासंचालक यांनी परवानगी दिलेल्या व्यक्ती, संस्था व इतर शासकीय विभागाकडून यशदा येथे आयोजित केलेल्या कार्यशाळा/प्रशिक्षण सत्रे/चर्चासत्रे व अन्य कार्यक्रमासाठी यशदाने निश्चीत केलेल्या दराप्रमाणेच आकारणी करण्यात यावी. याबाबत वेगळे असे शुल्क किंवा वेगळा मेनू देण्यात येवू नये. या व्यतिरिक्त इतर कोणासही या ठिकाणी सेवा देता येणार नाही. तसेच कंत्राटदारास यशदाच्या भोजनगृहामध्ये कोणत्याही प्रकारचे अन्न पदार्थ शिजवून/तयार करून बाहेर घेवून जाता येणार नाही. असा प्रकार आढळल्यास प्रत्येक प्रकरणी रूपये. २०००/- इतका भोजन कंत्राटदारास दंड आकारण्यात येईल.

२०.	भोजन कंत्राटदाराला भोजन समिती, वसतिगृह व्यवस्थापक यांचेकडून दोन आठवडयाचा मेनु **परिशिष्ट 'ड'** नुसार अगाऊ तयार करून देण्यात आलेला आहे. त्यानुसार भाज्या व मांस/ मच्छी इत्यादी सर्व ताजे व स्वच्छ स्वरूपातील पदार्थ रोजच्या रोज खरेदी करुन वापरणे बंधनकारक राहील. सर्व भोजन सामुग्रीची तपासणी तज्ञ व्यक्ती/ संस्था/ मेस कमिटी मार्फत महिन्यातून दोन वेळेस करण्यात येईल. तसेच मेनु मध्ये बदल झाल्यास वसतिगृह व्यवस्थापक यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील. मेनुमध्ये दिलेल्या अन्न पदार्थांच्या दर्जेचा **परिशिष्ट 'इ'** नुसार पुरवठा करणे बंधनकारक राहील. असा प्रकार आढळल्यास प्रत्येक प्रकरणी रूपये. २०००/- इतका भोजन कंत्राटदारास दंड आकारण्यात येईल.

२१.	भोजन कंत्राटदाराला आठवडयाच्या सर्व दिवशी दुपारचे शाकाहारी बुफे पध्दतीने व आठवडयातील सात दिवस रात्रीचे जेवण शाकाहारी व मांसाहारी बुफे पध्दतीचे तयार करून यांचे वेगळे वेगळे बुफे (शाकाहारी वेगळा व मांसाहारी वेगळा) नामफलकासहित लावुन संस्थेच्या आवारात पुरविणे बंधनकारक राहील.

२२.	भोजन कंत्राटदाराला आठवड्याच्या सर्व दिवशी (शनिवार,रविवार आणि सुटीचे दिवस धरून) आवश्यकते व सूचनेनुसार भोजनाची सेवा संस्थेच्या आवारात उपलब्ध करून दयावी लागेल. त्यासाठी एका दिवशी किमान किती व्यक्तींना भोजन द्यावे लागेल यासाठी किमान मर्यादा असणार नाही. तसेच विशेष प्रसंगी मा. महासंचालकांच्या मान्यतेने दरपत्रक "अ/अ2' किंवा 'ब' मधील दरांनुसार भोजन सुविधा यशदाच्या आवारात पुरवठा करणे बंधनकारक राहील.

२३.	सर्व पदार्थ यशदाच्या स्वयंपाकगृहात तयार करुन प्रशिक्षणार्थींना पुरवठा करणे बंधनकारक राहील. बाहेर तयार करुन पुरवठा केल्याचे दिसून आल्यास अशा प्रत्येक घटनेसाठी रूपये २,०००/- दंड आकारण्यात येईल.

२४.	स्वयंपाकघर डायनिंग हॉल येथे उंदीर, घुशी, झुरळे , माश्या इ. किटकांचा उपद्रव होणार नाही याची पूर्व दक्षता कंत्राटदाराने घ्यावी. यासाठी संस्थेकडून Pest Control उपाययोजना करण्यात येईल. त्यासाठी रू. १०००/- इतकी रक्कम प्रत्येक महिन्याच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

२५. संस्थेचे मा. महासंचालक, मा. अतिरिक्त महासंचालक, मा.उपमहासंचालक, निबंधक, वसतीगृह व्यवस्थापक, संस्थेचे मानसेवी वैद्यकीय अधिकारी किंवा मा. महासंचालकांनी प्राधिकृत केलेला इतर कोणतीही व्यक्ती किंवा संस्था यांना केव्हाही भोजनगृह, स्वयंपाकगृह किंवा कोठीची खोली इत्यादींची तपासणी करण्याचा अधिकार राहील. तसेच या अधिका-यांना भोजन कंत्राटदार पुरवित असलेल्या अन्न पदार्थांची तपासणी करण्याचाही अधिकार राहील. अन्नपदार्थ तयार करण्यासाठी **अ** दर्जाचा किराणा माल, उत्तम दर्जाचे वस्तू व भाजीपाला वापरला पाहिजे. **परिशिष्ट 'इ'** नुसार माल खरेदी करावा त्याची नोंद स्वतंत्र नोंदवहीमध्ये घ्यावी.

२६. भोजन कंत्राटदाराला प्रत्येक दिवशी प्रत्येक प्रशिक्षणार्थीसाठी सोबत जोडलेल्या दरपत्र (अ१) मध्ये नमूद केलेल्या मेनूप्रमाणे बेड टी, न्याहरी सोबत चहा/कॉफी/दुध, सकाळचा क्लासरूम चहा/कॉफी/दुध, दुपारचे जेवण, दुपारचा क्लासरुम चहा/कॉफी/दुध, आणि रात्रीचे जेवण पुरविण्यासाठी निर्दिष्ट दराने आकार दिला जाईल.

२७. सत्र संचालकांनी प्रशिक्षणार्थींचे दुपारचे जेवण तयार न करण्याबाबत एक दिवस अगोदर तर रात्रीचे जेवण तयार न करण्याबाबत त्याच दिवशी दुपारी दोन वाजेपर्यंत लेखी पूर्वसूचना दिली असेल तर त्या जेवणाचा खर्च देयकामध्ये आकारण्यात येऊ नये.

२८. रात्रीच्या जेवणासाठी वसतीगृहामध्ये राहणाऱ्या प्रशिक्षणार्थीच्या संख्येनुसार कंत्राटदारास रक्कम अदा केली जाईल. जर प्रशिक्षणार्थीकडून पूर्ण जेवण न मिळाल्याची लेखी तक्रार आल्यास मा.महासंचालक यांच्या मान्यतेने कपात केली जाईल. याबाबत मा. महासंचालक, यशदा यांचा मान्यतेने निर्णय अंतिम राहील.

२९. संस्थेचे महासंचालक, अतिरिक्त महासंचालक, निबंधक, वसतिगृह अधिक्षक, वसतिगृह व्यवस्थापक यांच्या मार्फत सूचना आल्यास संस्थेत आलेले पाहुणे, अभ्यागत वक्ते व इतर यांना चहा/कॉफी/जेवण इत्यादींचा पुरवठा करणे बंधनकारक राहील. त्याबाबतची देयके दरपत्रक "अ2' नुसार निश्चीत केलेल्या दरानुसार दर पंधरवडयाला अदायगीसाठी सादर करावीत.

३०. प्रशिक्षण कार्यक्रम पार पडल्यापासून ०२ दिवसाच्या आत प्रशिक्षण कार्यक्रमाची kot संबंधीत सत्र संचालकांकडे सादर करुन प्रमाणित करुन घेण्याची जबाबदारी भोजन कंत्राटदार यांची असेल. प्रमाणित करण्यात आलेली Kot चे देयके १५ दिवसातून एकदा वसतिगृह व्यवस्थापन विभागाकडे पाठविण्यात यावी.

३१. कार्यालयीन वेळेत संस्थेतील अधिकारी/कर्मचारी यांचे समवेत आलेले पाहूणे/अभ्यागत यांना चहा/कॉफी/भोजन इत्यादीचा पुरवठा केल्यास त्यांच्याकडून दरपत्रक "अ2' नुसार देयके वसूल करण्याची जबाबदारी भोजनगृह कंत्राटदार यांची राहील.

३२. मा. महासंचालक यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे भोजन व्यवस्था कंत्राटदारास पालन करावे लागेल. दैनंदीन भोजन व्यवस्थेवर वसतिगृह व्यवस्थापक यांची देखरेख राहील.

३३. भोजन कंत्राटदाराने ठरलेल्या वेळे प्रमाणे/लेखी दिलेल्या वेळेनुसार भोजन/भोजन गृहातील सुविधा देणे बंधनकारक राहील. तसेच भोजनाचा दर्जा किंवा चव योग्य ठेवण्याचे भोजन कंत्राटदास बंधनकारक राहील. यापैकी कोणत्याही प्रकारच्या त्रूटी आढळल्यास प्रत्येक प्रकरणी कंत्राटदारास रूपये ५०००/- दंड आकारण्यात येईल.

३४.	विशेष प्रसंगी ठरलेल्या विशेष मेनुप्रमाणे यशदाच्या भोजन गृह, बोर्डरूम, लेझीम किंवा यशदाच्या आवारात अन्य कोणत्याही ठिकाणी विशेष भोजन आयोजित केल्यास तेथे गरम अन्न पुरविणे भोजन कंत्राटदारास बंधनकारक राहील. त्यासाठी दरपत्रक "अ1'/अ2' व 'ब' नुसार दर अदा केले जातील. याबाबत वेगळे सेवाशुल्क दिले जाणार नाही.

३५.	यशदामध्ये वर्ग १, वर्ग २,वर्ग ३ आणि वर्ग ४ कर्मचारी आहेत. सर्व अधिकारी/ कर्मचारी यांना खाली नमूद केलेल दर फक्त कार्यालयीन वेळेत कार्यरत असताना अनुज्ञेय होतील. इतर वेळेसाठी दरपत्रक "अ2' व 'ब' प्रमाणे दर आकारुन वसुली करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

| तपशिल | कायम /प्रतिनियुक्ती/ करार तत्वावरील अधिकारी / कर्मचारी तसेच वर्ग ४ चे कर्मचारी यांचेसाठी दर |
|---|---|
| **चहा/कॉफी** | दरपत्रक "अ2' मध्ये प्राप्त झालेल्या दरांमध्ये ३० टक्के सुट देऊन दर निश्चित करण्यात येईल. |
| **न्याहरी** | |
| **दुपारचे जेवण (स्वीट डीश सह)** | |

कार्यालयीन वेळेत संस्थेच्या आवारात कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांकरिता दिवसातून दोन वेळा चहा/कॉफी कंत्राटदाराने सकाळी ११.०० ते ११.१५ व दुपारी ३.०० ते ३.३० या वेळेत पुरवायचा आहे. सदरचा चहा/कॉफी व्यवस्था संस्थेमार्फत विनामुल्य कर्मचाऱ्यांना देण्यात येते. त्यासाठी दररोज सकाळी ३०० व दुपारी ३०० असे एकूण ६०० कप याप्रमाणे दरपत्रक अ मध्ये प्राप्त झालेल्या दरामध्ये ३०% सूट देवून दर निश्चित करण्यात येईल त्याप्रमाणे एकूण कामाच्या दिवसाच्या हिशोबाने देयक तयार करुन कंत्राटदाराने दरमहा देयक वसतिगृह व्यवस्थापन विभागाकडे अदा करणेसाठी सादर करावे.

३६.	आंबेडकर स्पर्धा परिक्षा केंद्रामार्फत **यशदामध्ये ७० विद्यार्थी असतात. या सर्व विद्यार्थ्यांना दरपत्रक 'अ२' मध्ये प्राप्त झालेल्या दरांमध्ये ३० टक्के सुट देऊन दर निश्चित करण्यात येईल.** त्यानुसार भोजन पुरवठा करावा लागेल. भोजन सुविधेपोटी देय होणारी रक्कम कंत्राटदाराने दरमहा विद्यार्थ्यांकडून घ्यावी. वसुलीबाबत यशदा जबाबदार रहाणार नाही.

३७.	भोजन गृहाच्या कामाचे स्वरुप पहाता फक्त ६ (सहा) कर्मचाऱ्यांना भोजनगृहाच्या मागे असलेली खोली वापरासाठी देण्यात येईल. त्यांच्या राहण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार प्राप्त होणार नाही. त्याचबरोबर कंत्राटदारास आणि त्याच्या नोकरवर्गास कोणत्याही स्वरूपाचे दिवाणी कायद्यास अनुसरून असणारे कोणतेही अधिकार प्राप्त होणार नाहीत. भोजन व्यवस्थेबाबतचा करार संपुष्टात आल्यानंतर भोजन कंत्राटदाराने त्याच्या कर्मचारी वर्गाला संस्थेच्या आवारात दिलेली जागा करार संपुष्टात येईल त्या दिवशी पूर्णपणे रिकामी करावी लागेल.

३८.	पुरविण्यात आलेल्या भोजन सेवेचा दर्जा **मुल्यमापनातील तीन गुणाच्या खाली गेल्यास देयकाच्या १० टक्के तर दोन गुणाच्या खाली गेल्यास २० टक्केपर्यंत रक्कम** संबंधित प्रशिक्षण कार्यक्रमाच्या देयकातून कपात करण्यात येऊन उर्वरित रक्कम भोजन कंत्राटदाराला अदा करण्यात येईल. **तसेच सलग ३ महिने सर्वप्रशिक्षण कार्यक्रमाच्या भोजनाच्या दर्जाबाबत अतिउत्कृष्ट अस भारांक नोंदविले गेल्यास २ टक्के वाढ देयकांत मा. महासंचालक यांच्या मान्यतेने करण्यात येईल.**

३९.	निविदेतील कोणत्याही अटी व शर्तीचा कंत्राटदाराकडून भंग होत असल्यास प्रत्येक वेळी प्रत्येक बाबीसाठी व अटीभंगाच्या प्रत्येक वेळेसाठी रू. ५,०००/- पर्यंत दंड आकारण्यात येईल मा.महासंचालक यांच्या मान्येतेने. दंडाची रक्कम देयकातून वसूल करण्यात येईल.  याबाबत कोणतीही सवलत दिली जाणार नाही.

४०.	संस्थेतील अधिकारी/ कर्मचारी व प्रशिक्षणार्थी यांनी कार्यालयीन वेळेनंतर/ प्रशिक्षण सत्र संपल्यानंतर चहा/कॉफी/दुध/बिस्किट/थंड पेय/स्नॅक्स किंवा भोजन सुविधेची मागणी केल्यास दरपत्रक 'ब' नुसार रोख रक्कम स्वीकारून तयार असलेल्या  पदार्थांचा पुरवठा करावा.

४१.	संस्थेमार्फत कंत्राटदारास पुरविण्यात आलेले क्रॉकरी/कटलरी/स्वयंपाकाची भांडी/साहित्य इत्यादी ठेका संपल्यावर किंवा दरम्यान इनव्हेंटरी (Inventory) केल्यावर आढळून आलेल्या गहाळ (Shortage) वस्तू पोटी संस्थेला वस्तुला वस्तू किंवा गहाळ वस्तूची खरेदीची किंमत भरपाई पोटी भरणा करणे बंधनकारक राहील.  तसेच जड वस्तू उदा. Deep frezer, Refrigerator, Grinder machine, Cooking Range, Oven, Dish Washer इत्यादी नादुरुस्त वस्तूंच्या दुरुस्तीचा खर्च कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येईल. त्याचप्रमाणे तुटफुट वस्तू पोटी खरेदीच्या किंमतीमध्ये १५ टक्के सवलत एक वर्षासाठी देऊन उर्वरीत रक्कम संस्थेकडे भरणा करणे बंधनकारक राहील. रक्कमेचा भरणा न केल्यास देयकातुन वसुल करण्यात येईल किंवा ठेका सपुष्टात आल्यावर सुरक्षा ठेवेतून वजा करण्यात येईल.  न वापरता येणार (unserviceable) साहित्य (क्रॉकरी, कटलरी, स्वंयंपाकाची भांडी , जड वस्तू) संस्थेस जमा केल्यास सदर वस्तूंसाठी कोणतीही वसूली ठेकेदारकडून करण्यात येणार नाही. क्रॉकरी तडा गेल्यास कंत्राटदाराने ती संस्थेकडे जमा करुन बदली करुन घेणे आवश्यक राहील. प्रशिक्षणार्थी  वा यशदा कर्मचारी यांचेकडून तुटफुट झाल्यास वेळोवेळी त्याची नोंद स्वंतत्र रजिस्टर मध्ये घ्यावी व त्यावर संबंधित प्रशिक्षणार्थी /सत्रसंचालक यांची स्वाक्षरी घ्यावी. तदनंतर सदर तुटफुटीसाठी वसूली करण्यात येणार नाही.

४२.	करार कालावधीमध्ये कंत्राटदाराची सेवा असमाधानकारक आढळून आल्यास संस्थेमार्फत ठेका रद्द करण्याची ३० दिवसांची नोटीस देण्यात येईल,  त्याच प्रमाणे कंत्राटदारामार्फत ठेका रद्द करावयाचा झाल्यास कंत्राटदाराने संस्थेला  ९० दिवसांची आगाऊ नोटीस देणे बंधनकारक राहील.

४३.	या निविदेतील कोणत्याही अटी व शर्तीचा/ कराराच्या एखाद्या कलमाच्या अर्थाविषयी शंका किंवा वाद उपस्थित झाल्यास मा. महासंचालक, यशदा यांचा निर्णय अंतिम राहील आणि तो सर्वांवर बंधनकारक राहील.

४४.	निविदा कोणत्याही टप्यावर रदद करणे अथवा अंतिमत: स्विकारण्याचा निर्णय या कार्यालयाने राखून ठेवला आहे.

४५. या करारास पुणे शहरापुरतेच न्यायाधिकार कक्ष (Legal   Jurisdiction) मर्यादित राहील.

४६.	जर पुढील नमूद असमाधानकारक बाबी पैकी कोणत्याही एका कारणास्तव यशदा  कडून निविदाधारकाचे काम काढुन घेण्यात आले व जर नविन कंत्राटदाराकडून करार कालावधीत काम करुन घ्यावे लागले तर अशा वाढीव खर्चाची भरपाई सुरक्षा रक्कमेतून वसूल करण्यात येईल.

४७.	या करारान्वये सोपविण्यात आलेले भोजन व्यवस्थेचे काम भोजन कंत्राटदारास इतर कोणत्याही कंत्राटदाराकडे अथवा एजन्सीकडे हस्तांतरीत करता येणार नाही वा सोपविता येणार नाही.

४८.	सदर करारान्वये सोपविण्यात आलेल्या भोजन व्यवस्थेच्या कामासाठी कंत्राटदाराने नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे वर्तन सौजन्यशील, नम्र व सहकार्याचे असणे आवश्यक आहे. यासाठी कत्रांटदाराने आपल्या कर्मचाऱ्यांना नेमण्यापुर्वी आवश्यक ते प्रशिक्षण देणे अनिवार्य आहे जेणेकरुन यशदाची प्रतिमा उंचावण्यास मदत होईल.

४९.	सदर करारान्वये सोपविण्यात आलेल्या कामासाठी कत्रांटदाराने नेमलेल्या कर्मचाऱ्यास कोणतीही दुर्घटना, अपघात अथवा दुखापत झाल्यास त्याची व त्यापोटी होणाऱ्या नुकसान भरपाई बाबत सर्वस्वी जबाबदारी भोजन कत्रांटदाराची असेल. यासाठी कंत्राटदाराने नेमलेल्या कर्मचाऱ्यास आवश्यक ते विमा संरक्षण देण्याची जबाबदारी भोजन कंत्राटदाराची असेल व यासंदर्भात कोणत्याही प्रकारची जबाबदारी यशदाची नसेल.	तसेच कंत्राटदारामार्फत पुरविण्यात आलेल्या अयोग्य भोजन व्यवस्थेमुळे संस्थेच्या कर्मचाऱ्यास किंवा प्रशिक्षणार्थीस कुठल्याही प्रकारचे आजारपण, दुर्घटना, अपघात अथवा दुखापत झाल्यास त्याची व त्यापोटी होणाऱ्या नुकसान भरपाई बाबत सर्वस्वी जबाबदारी भोजन कत्रांटदाराची असेल.

५०.	प्रचलित कायदयानुसार आवश्यक असणाऱ्या सर्व वैधानिक नोंदवहया अथवा अभिलेख ठेवणे भोजन कंत्राटदारावर बंधनकारक आहे. तसेच मागणी केल्यावर संबंधित वैधानिक नोदंवहया अथवा अभिलेख संबंधित प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी भोजन कंत्राटदाराची असेल. यासंदर्भात वैधानिक तपासणी दरम्यान कोणतीही त्रृटी आढळल्यास त्यासाठी व त्याच्या निराकरणाची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

५१.	असमाधानकारक सेवेच्या बाबी.

१. पदार्थांची गुणवत्ता योग्य दर्जाची नसणे.
२. आरोग्य विभागाच्या तपासणीनुसार पदार्थामध्ये भेसळ आढळणे.
३. वेळेवर जेवण/ भोजन सुविधा न पुरविणे.
४. कर्मचारी संख्या भोजनार्थीच्या प्रमाणा पेक्षा कमी असणे.
५. गणवेश परिधान केलेला नसणे.
६. कर्मचाऱ्यांची नियुक्ती विषयक माहिती कर्मचारी कामावर रुजू होण्यापूर्वी न देणे.
७. स्वयंपाक गृह सतत स्वच्छ न राहणे.
८. कर्मचाऱ्यांनी स्वत:ची स्वच्छता न पाळणे.
९. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाचा अभाव.

---

**दर महिना/ वेळोवेळी भांडर गृहाची व इतर सर्व्हिसेसची पडताळणी तक्ता**

१. पर्यवेक्षक - १
२. हेडकूक - १
३. सहायक कुक - ३
४. पॅन्ट्रीमॅन - १
५. हेल्पर - ५
६. मोरी कामगार - ७
७. सर्विस बॉईज - १७

| | | | |
|---|---|---|---|
| १. | तांदूळ | बासमती, कोलम, आंबेमोहर | |
| २. | डाळी | तूर डाळ, चांगल्या दर्जाचा (क्र.१)<br>मूग डाळ, चांगल्या दर्जाचा (क्र.१)<br>हरभरा डाळ, चांगल्या दर्जाचा (क्र.१)<br>मसूर डाळ, चांगल्या दर्जाचा (क्र.१)<br>उडीद डाळ, चांगल्या दर्जाचा (क्र.१) | |
| ३. | गहू | एम पी लोकवान/सिहोर | |
| ४. | खाण्याचे तेल | सनफ्लॉवर / पोस्टमन / प्रिन्स / धारा/ गोदरेज | |
| ५. | लोणची | बेडेकर/प्रविण/केप्र | |
| ६. | पापड | लिज्जत /प्रविण | |
| ७. | ब्रेड | ब्रिटानिया/मॉर्डन/शक्ती/ओव्हन फ्रेश | |
| ८. | बटर | अमूल/आरे/विजया | |
| ९. | जाम | किसान/मेप्रो/नोगा | |
| १०. | सॉस | मॅंगी/किसान/डिपी | |
| ११. | दूध | चितळे/भुजबळ/गोकूळ/कात्रज/नवनाथ | |
| १२. | चहा | टी-बॅग्ज : ताज महल/ लिप्टन/सोसायटी | |
| १३. | कॉफी | नेसकॉफी किंवा रिच केफ | |
| १४. | बिस्कीट | मारी, नाईस, मोनॅको, टॉप, गूड डे, क्रॅकजॅक, आरेंज क्रिम, बॉर्नबॉन डिलाईट, पार्ले-जी | |
| १५. | कोंबडी | चांगल्या दर्जाचे ताजे १०००-१२०० ग्रॅम इतके वजनाचे | |
| १६. | मटण | चांगल्या दर्जाचे - लोकल मार्केट मधील ताजे | |
| १७. | मासे | चांगल्या दर्जाचे- लोकल मार्केट मधील ताजे पॉमफ्रेट किंवा सुरमई | |
| १८. | मसाला | प्रविण/एव्हरेस्ट/बेडेकर/केप्र/बादशहा | |